International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 11 No. 4 March-April 2024

# किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपादणुक यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास

**डॉ.स्वाती वसंतराव चव्हाण**
के.सी. ई.सो शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय जळगाव
**Corresponding Author:- डॉ.स्वाती वसंतराव चव्हाण**
**DOI- 10.5281/zenodo.11071847**

**प्रस्तावना :-**

आजच्या आधुनिक युगात वाढत चाललेली स्पर्धा, ताण तणाव, परिक्षेचे टेन्शन, कौटुंबिक समस्या, आर्थिक परिस्थिती, बेरोजगारी या सारख्या समस्यामुळे मानवी जीवन धकाधकीचे व चिंताग्रस्त बनले आहे म्हणुन व्यक्तीच्या मनामध्ये सतत विचार व गोंधळ चाललेला असतो तसेच संपूर्ण शिक्षण प्रक्रियेचे उद्दिष्टे मुलांचे सर्वागीण विकास घडवून त्यांना समाजाचा सुजाण नागरिक बनविणे असा आहे किशोरावयीन कालखंडात विद्यार्थ्यांमध्यचे शारीरिक, भावनिक, मानसिक बदल होत असतो लैंगिक प्रश्नाबद्दल मनामध्ये कुतूहल, चिंताग्रस्त भवनाक्षोम कलपनाविश्वात रममाण, घरातील वातावरण, शालेय कार्यक्रम व्यवस्थापन, आई-वडील-नातेवाईक-शिक्षक यांच्याशी अंतरक्रिया इ. यामुळे किशोर हा मानसिक गोंधळामध्ये असतो याचा परिणाम मानसिक आरोग्यावर होतो. अध्ययनात असे विद्यार्थी मागे पडतात म्हणुन देशासाठी सुजाण चरित्र संपन्न नागरिक निर्माण होण्यासाठी व ज्यांच्यावर देशाचे भवितव्य अवलंबुन आहे त्या किशोरांचे शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक अरोग्य उत्तम असणे आवश्यक आहे.

**गरज:**

गरज ही शोधाची जननी आहे व्यकीतच्या गरजेची पूर्तता करण्यासाठी संशाधने केली जातात आजपर्यंत शारीरिक आजारावर खुप संशोधन झाली आहेत. पण मानसिक आजारावर संशाधेन करणे खुप गरजेचे आहे शारीरिक आजार हे आपल्याला दृश्य स्वरूपात दिसतात पण मानसिक आजार आपल्याला दिसतील असे नाही म्हणून या मानसिक आरोग्यावर संशोधन करणे गरजेचे आहे किशोरा विद्यार्थ्यांच्या भावनिक, मानसिक आणि सामाजीक समायोजन साधण्यासाठी, मनोविकृती टाळण्यासाठी, जीवनातील संकटे, अडथळे पार करण्यासाठी, व्यक्तिमत्व विकास व जीवनात यशस्वी होण्यासाठी मानसिक आरोग्यावर संशोधन करणे गरजेचे आहे.

**महत्व:**

संशोधनाचे कार्य करतांना समस्या इतकेच संशोधन हे महत्व या घटकाला असेते प्रत्येक व्यक्तीला जीवनात यशस्वी होण्यासाठी शरीर मन या दोघांच्या संतुलनामुळे व्यक्तीमत्व विकास होत असतो पण व्यक्तीला होणारे शारीरिक आजार आपल्याला दृश्य स्वरूपात दिसतात पण व्यक्तीच्या मनाला ही आजार असतात पण ते आपल्याला दसित नाही शालेय जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे किशोर, कारण हा कालखंड वादळाचा अशांततेचा काळ परिवर्तनाचा, संक्रमणाचा काळ असतो शारीरिक वाढीबरोबर मानसिक प्रगलभता लैंगिक परिपक्वता भिन्न लिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण, भावनकि, मानसिक संघर्ष त्यांचा मनामध्ये गोंधळ निर्माण होऊन मनावर ताण येतो परिक्षेचे टेन्शन कौटुंबिक समस्या आर्थिक परिस्थिती इ. समस्यांचे शिक्षकांनी पालकांनी योग्य मार्गदर्शन केले नाही तर ही मुले गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळतात व समाजविरोधी वर्तन करतात यासाठी मानसिक आरोग्यावर संशोधन होणे महत्वाचे आहे.

**उद्दिष्टे:**

१) किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्याचा अभ्यास करणे.

२) किशोरावयीन मुला-मुलींच्या मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपादणुकीत सार्थ फरक असतो.

३) किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपादणुकीतील परस्परसंबंधाची तुलनात्मक सार्थ फरक असतो.

**परिकल्पना:**

1) किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपादणुकीत धनात्मक सहसंबंध असतो.

2) किशोरावयीन मुलां-मुलींचे मानसिक आरोग्य व संपादणूकीत सार्थ फरक असतो.

3) किशोरावयीन मुलां-मुलींचे शैक्षणिक संपादणुकीत गुणांकाच्या मध्यमानात सार्थ फरक असतो.

**व्याप्ती:**

प्रस्तुत संशोधन हे जळगाव जिल्हातील नूतन मराठा माध्यमिक विद्यालयातशी निगडीत आहे. प्रस्तुत संशोधन हे जळगाव जिल्हातील नूतन मराठा माध्यमिक विद्यालयातील इ.१०वी च्या या वर्गातील किशोरांचा मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपादणूकीचा अभ्यास केला जाईल.

**मर्यादा:**

प्रस्तुत संशोधन नुतन मराठा माध्यमिक विद्यालय, जळगांव या शाळेतील इ.१० या वार्गतील किशोरा मूलांपुरतेच मर्यादीत आहे. प्रस्तुत संशोधन हे किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपदणुकीचा अभ्यासापुरतेच मर्यादीत असेल.

**संशोधनपध्दती:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने किशोरावयीन मुलांचे मानसिक आणि शैक्षणिक संपादणूक यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास हा विषय वर्तमान काळाशी संबंधित असल्यामुळे संशोधक वर्णनात्मक संशोधनपध्दतीतील सर्वेक्षण आणि संशोधनपध्दतीचा अवलंब केला जाईल.

**जनसंख्या:**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने जळगाव जिल्हातील नूतन मराठा माध्यमिक विद्यालयातील इ. १० वी या वर्गातील एकुण विद्यार्थी संख्या ४०० एवढी जनसंख्या आहे.

**न्यादर्श:**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने १ माध्यमिक विद्यालयातील इ. १० वी च्या वर्गामधील २०० विद्यार्थ्यांची बहुस्तरीय नमुना निवड केली जाईल.

**साधने:**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्याचे मापन करण्यासाठी आनंदकुमार यांची प्रामाणित मानसिक आरोग्य चाचणीचा वापर केला जाईल. आणि संपादणूकीसाठी वार्षीक गुणपत्रकांचा वापर केला जाईल.

**प्रत्यक्ष कार्यवाही:**

प्रस्तुत संशाधन कार्य करण्यासाठी आनंदकुमार यांनी तयार केलेल्या प्रमाणित चाचणीचा किशोरावयीन मुलां-मुलीं कडून ती मानसिक आरोग्य प्रमाणित चाचणी भरून घेतली जाईल व संशोधनाची प्रत्यक्ष कार्यवाही संशोधकाने पूर्ण केली जाईल. आणि संपादणूकीसाठी वार्षीक गुणपत्रकांचा वापर केला जाईल.

**संकलीत माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ:**

प्रस्तुत संशोधनसाठी संकलीत केलेल्या माहितीचे विश्लेषण हे मध्यमान, प्रमाणविचलन, पीअरसनचा ४ दोन चलांमधील कशा प्रकारचा सहसबंध आहे याबाबत निषर्क काढण्यासाठी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला जाईल.परिकल्पना परिक्षणासाठी t परिक्षिका या संख्या शास्त्रीय तंत्राचा वापर केली जाईल व निष्कर्ष काढण्यात येईल.

| तपशील | एकूण विद्यार्थी संख्या | मध्यमान गुणांक | प्रमाण विचलन | t मूल्य |
|---|---|---|---|---|
| मानसिक आरोग्य | 200 | 131.08 | 7.34 | 0.96 |
| शैक्षणिक संपादणूक | 200 | 130.70 | 6.07 | |

**निष्कर्ष :**

1) किशोरावयीन मुलांचे मानसिक आरोग्य आणि शैक्षणिक संपादणुकीत धनात्मक सहसंबंध असतो.

2) किशोरावयीन मुलां-मुलींचे मानसिक आरोग्य व संपादणूकीत सार्थ फरक नसतो.

3) किशोरावयीन मुलां-मुलींचे शैक्षणिक संपादणुकीत गुणांकाच्या मध्यमानात सार्थ फरक नसतो.

**संदर्भ:**

1. मुळे, रा. शि आणि उमाठे, वि.तू (१९७८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. महाराष्ट्र राज्य साहित्य निर्मिती मंडळ, नागपुर
2. कळके, माधवी, शिरगावे दादासाहेब आणि शेंडगे (२०००) अध्ययनार्थ्यांचे मनसशास्त्र आणि अध्यापन प्रक्रिया फडके प्रकाशन, कोल्हापुर
3. करंदीकर, सुरेश आणि जगताप, ह.ना. (२००५) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र फडके प्रकाशन, कोल्हपुर
4. जगताप, ह.ना. (२००६) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हपुर
5. Buch. M. B. Education (१९७८ - १९८३) survey of Research in - Education, volume III New Delhi. N.C.E.R.T.
6. Buch. M. B. Education (१९८२) fitth survey of Research in Education, New Delhi. N.C.E.R.T.
7. Buch. M. B. Education ( 98 angle3-98 angle c) forth survey of Research in Education, New Delhi. N.C.E.R.T.